# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 82/2022 दिनांक : 24.02.2022

### अवैध पिस्टल बाळगणाऱ्यास पोस्टे शिवाजीनगर यांनी केले गजाआड

नांदेड शहरातील गुन्हेगांरावर वचक निर्माण करून गुन्हेगारी करणारे व अवैध शस्त्रा बाळगणारे गुन्हेगांराना गजाआड करण्याचे आदेश एका मिटींग दरम्यान **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री निलेश मोरे,** अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री विजय कबाडे,** अपर पोलीस अधिक्षक भोकर, **मा. श्री चंद्रसेन देशमुख**, उप विभागयीय पोलीस अधिकारी नांदेड शहर यांनी पोनि पोस्टे शिवाजीनगर **मा. श्री अनंत नरूटे** यांना दिले होते. पोनि पोस्टे शिवाजीनगर यांनी पिस्टल वापरून गुन्हे करणारे गुन्हेगारांची माहिति गोपनिय माहिती काढुन त्यांचेवर गंभीर स्वरूपाची कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्याने त्यांचेवर पाळत ठेवण्याचे काम सुरू केले.

दिनांक 24.02.2022 रोजी पोनि **मा. श्री अनंत नरूटे** यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील सपोनि **श्री रवि वाहुळे** व अंमलदार हे गस्त घालीत असतांना पोस्टे शिवाजीनगर गुरन 75/2022 कलम 392, 34 भादवि मधील आरोपी नामे शेख इरफान शेख गडडु उर्फ कुबडा वय 23 वर्षे, रा. नई आबादी नांदेड याचा शोध घेत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, सदर आरोपी हा विना परवाना बेकायदेशिरत्या गावठी पिस्टल सोबत घेवुन डॉक्टर लाईन सार्वजनिक शौचालय, शिवाजीनगर नांदेड भागात फिरत आहे अशी माहिती मिळाले वरून लागलीच गुन्हे शाध पथक रवाना करून सापळा लावुन सदर आरोपीस पकडुन ताब्यात घेवुन अंग झडती घेतली असता एक गावठी बनावटीचे पिस्टल किंमती 45,000/-रूपयाचे व एक लाल रंगाची होंडा युनिकॉर्न कंपणीची चोरी केलेली मो सा किंमती 85,000/-रूपयाची असा एकुण 1,30,000/-रूपयाचा मुदेमाल जप्त करण्यात आला. पिस्टल बाळगले प्रकरणी पोस्टे शिवाजीनगर येथे गुरन 77/2022 कलम 3/25 भाहका नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही वरीष्ठांचे आदेशान्वये व **पोनि मा. श्री अनंत नरूटे** यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोधपथकाचे सेपानि **श्री रवि वाहुळे**, पोह/संजय मुंढे, रामकिशन मोरे, पोना/लियाकत शेख, पोशि/राजकुमार डोंगरे, काकासाहेब जगताप, मधुकर अवतिरक यांनी चांगली कामगीरी केली आहे. त्याबदल वरिष्ठांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

